कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०२/१०/२०१७

# *आलदंडी गावकऱ्यांनी केली ०६ भरमार रायफल जमा*

०२ आक्टोंबर महात्मा गांधी यांचे जयंती निमीत्ताने अहिंसेचा मार्ग अवलंबत एटापल्ली तालुक्यातील नक्षलदृष्टया संवेदनशिल अशा मौजा आलदंडी गावातील नागरिकांनी आपल्या जवळील ०६ भरमार रायफल पोमके आलदंडी येथे जमा केले. एप्रिल २०१७ मध्ये नव्याने स्थापन झालेल्या पोमके आलदंडीचे प्रभारी अधिकारी योगेश दाभाडे यांनी नागरिकांसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी जिल्हा पोलीस व एसआरपीएफ यांच्या माध्यमातुन नवनविन योजना राबविल्या. त्याचबरोबर शासनाच्या योजनांची माहिती परीसरातील सर्व गावांमध्ये देवून गावकऱ्यांच्या समस्याही जाणून घेतल्या. पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी ग्रामभेटी दरम्यान गावातील नागरिकांना, पोलीसांना सहकार्य करण्याबद्दल आवाहन केले होते. या आवाहानाला नागरिकांनी प्रतिसाद देत शस्त्र न उचलण्याचा निश्चय करत आपल्याजवळील भरमार रायफल पोलीसांकडे जमा करून नक्षलवादयांचा धिक्कार केला.

यावेळी आलदंडीचे प्रभारी अधिकारी योगेश दाभाडे, एसआरपीएफ ग्रुप ६ चे पोउपनि जोशी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

